// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ-२०१९/स्त्रिगर्भ/का-०७/६६८
दिनांक :- १०.०४.२०१९.

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हा-बीड.

विषय :-'बीड जिल्हयातील बऱ्याच स्त्रियांना गर्भ का नाहीत'मथळयाखाली दि.०९.०४.२०१९ च्या दैनिक वृत्तपत्र 'द हिंदू' मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत.

महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १० (१) (फ) (एक) व (दोन) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगास स्त्रियांशी निगडित प्रकरणे स्वीकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले आहेत.

बीड जिल्हयातील वाझंरवाडी येथील उसतोडणी महिला कामगारांना गर्भाशय काढून टाकण्यास भाग पाडल्याचे वृत्त 'द हिंदू' या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. या गावातील सुमारे ५०% टक्के महिलांना गर्भाशय टाकून टाकण्यास भाग पाडल्याचे सदर बातमीवरुन समजते. सदर प्रकरणाची आयोगाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणी आपण सत्यता पडताळून वस्तुस्थिती जाणून घ्यावी.

महिला आयोगाच्या मा.अध्यक्षा या गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) या बाबतच्या राज्यस्तरीय संनियंत्रण व अंमलबजावणी समितीच्या ही अध्यक्ष आहेत. मा.अध्यक्षांनी निर्देश दिले आहे की, महिलांच्या प्रतिष्ठेला व महिलांचे हक्क हिराहून घेण्याचे कृत्य हया जिल्हयातील महिलांच्या बाबतीत घडलेले आहे. यास्तव आपण या प्रकरणी व्यक्ती:श लक्ष घालून तात्काळ चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करावी. जेणेकरुन भविष्यात अशाप्रकारच्या घटनेस आळा बसेल.

तरी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आपण व्यक्तीश: लक्ष घालून योग्य ती उचित कार्यवाही करावी, असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिलेले आहेत. यास्तव आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा १९९३ कलम १२(२) व (३) नुसार त्वरित पाठवावा, ही विनंती.

आपली,
आ.शै.सोज्वळ

(आ.शै.सोज्वळ)
प्रशासकीय अधिकारी

सोबत- वृत्तपत्राचे कात्रण